गृह विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

अ.शा.पत्र क्रमांक :-आयआयएस-०७०९/प्रक्र.१३९/राऊशु-२.

दि.२९-७-२००९

महाराष्ट्र शासन

चिं.शा.संगीतराव
**सचिव**
(परिवहन व राज्य उत्पादन शुल्क)

विषय :- ग्रामरक्षक दल सदस्यांनी अवैध दारुबाबत केलेल्या तक्रारीसंबंधी त्वरित कारवाई करण्याबाबत.

प्रिय श्री.चहल

आपणास माहित आहे की, शासन आदेशामार्फत ग्रामरक्षक दल स्थापन झालेले आहे. ग्रामरक्षक दल दारुबंदी व अवैध दारुचा प्रसार थांबविण्यासाठी सुध्दा योग्य ते कार्य करीत असतात. या संदर्भात ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांनी अवैध दारु धंदयाबाबत काही तक्रारी केल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिका-यांनी त्याची त्वरित नोंद घेऊन अवैध दारु धंदयात गुंतलेल्या व्यक्तीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदयाच्या तरतूदीनुसार योग्य ती त्वरित कारवाई करण्याबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व अधीक्षक, निरीक्षक दुय्यम निरीक्षक व जवान यांना देण्यात याव्यात तसेच कारवाई न केल्याबद्दल काही तक्रारी आल्यास किंवा संबंधित अधिका-यांनी अशा तक्रारीची दखल घेतली नाही असे आढळल्यास त्या अधिका-याविरुध्द सुध्दा त्वरित कारवाई करण्यात यावी असे निदेश देण्यात येत आहेत.

आपला स्नेहांकित,

(चिं. शा. संगीतराव)

श्री.आय.एस.चहल,
आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
मुंबई.